तसेच अनुदान मंजुरी ही खाली नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन असल्यामुळे या अटींची पूर्तता झाल्याची खात्री विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी करुन घेऊन निर्धारण करावे.

१] अनुदान निर्धारण करताना फक्त शासनाने मान्यता दिलेल्या तुकड्याच विचारात घ्याव्यात.

२] जी विद्याशाखा अनुदानावर आणली आहे त्या विद्याशाखेचा कार्यभार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडून तपासून घेऊन मान्य शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजूर करुन द्यावीत.

३] अनुदान निर्धारण करताना विद्यापीठाने व शासनाने त्या संबंधित महाविद्यालयाच्या विद्याशाखांना व तुकड्यांना संलग्नीकरण मंजूर केल्याची खात्री करुन घ्यावी.

४] शिक्षक व शिक्षकेतर पदांवरील नियुक्त केलेले कर्मचारी शासनाच्या व विद्यापीठाच्या आदेशानुसार सेवाप्रवेशाच्या अटी पूर्ण करतात. शिक्षक संवर्गातील नेमणूकांना विद्यापीठाची मान्यता प्राप्त झाली आहे.

५] शिक्षकेतर पदांवरील नियुक्त्या करताना शासनाच्या मागासवर्गीय आरक्षणाबाबत असलेल्या तरतुदींचे पालन केले आहे. शिक्षक पदाच्या बाबतीत ती कार्यवाही संबंधित विद्यापीठांनी केलेली आहे.

६] वरील अटी व अशासकीय महाविद्यालयांच्या मान्यतेबाबत/संलग्नीकरणाबाबत शासनाने विद्यापीठाने विहित केलेल्या सर्व अटींची पूर्तता झालेली आहे.

७] संबंधित महाविद्यालयांनी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या/करणाऱ्या आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे.

८] ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे ते शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी/ उच्च माध्यमिक विद्यालयात/माध्यमिक शाळेत/संस्थेत पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करीत नाही.

९] संस्थेने महाविद्यालयासाठी स्वत:च्या मालकीच्या पुरेशा इमारतींची सोय उपलब्ध करुन दिलेली आहे.

१०] विद्यापीठाची रितसर परवानगी घेऊन पूर्णवेळ प्राचार्यांची निवड समितीद्वारा नेमणूक करणे आवश्यक आहे.

११] संस्थेविरुध्द कोणत्याही तक्रारी नसाव्यात व न्यायालयीन प्रकरणे नसावीत. शासनाने वेळोवेळी घालून दिलेले नियम व निकष यांचे संस्थेने तंतोतंत पालन करावे.